# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना** :- {**प्र.आ.यो.**} केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात तथा नागपूर शहरात अंमलबजावणी माहे डिसेंबर 2015 पासून करण्यात आली असुन सदर योजनेची मुदत डिसेंबर 2024 रोजी संपुष्टात येत आहे. मात्र, अजूनही देशात परवडणा-या घरांची मागणी विचारात घेऊन केंद्र शासनाने दि.01/09/2024 पासून प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 ची देशात अंमलबजावणी करण्याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून राज्य शासनाने शासन निर्णय क्र. प्रआयो 2024/प्र.क्र.87/गृनिधो-2 दि.15/10/2024 अन्वये सदर योजना राज्यात अंमलबजावणी करण्यास मान्यता दिलेली आहे. प्रधानमंत्री आवास योजना शहरी 2.0 ही योजना नागरी क्षेत्राकरीता दि.01/09/2024 पासुन पाच वर्षाकरीता राबविण्यात येणार आहे. सर्व पात्र कुटुंबाना / लाभार्थ्यांना घर उपलब्ध करून देण्याकरीता केन्द्र शासनाच्या आर्थीक सहाय्याने राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी प्रधानमंत्री आवास योजना शहरी 2.0 नागपूर महानगरपालिकेद्वारे नागपूर शहराचे हद्दीत राबविण्याबाबत मनपा महासभा ठराव क्रं. 116/मनपा/प्रशासक दि. 04/01/2025 अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

नागपूर शहरातील इच्छुक नागरीक घटक क्र. 1 BLC अंतर्गत घर बांधकामाकरीता रु. 2.50 लक्ष अनुदान मिळण्यास्तव केंद्र शासनाचे PMAYMIS Portal वर ऑन लाईन अर्ज सादर करीत आहे.

केंद्र शासनाचे PMAYMIS पोर्टलवर प्राप्त अर्जांची तपासणी प्रकल्प सल्लागार मे. आर्चिनोवा डिझाईन इंक व प्रधानमंत्री आवास योजना कक्षाद्वारे करण्यात येत असुन सध्या स्थितीत 250 पात्र अर्जदारांचा प्रकल्प अहवाल क्र. 2 तयार करण्यात आलेला आहे.

करिता प्रधानमंत्री आवास योजना शहरी – 2.0 मधील घटक क्र. 1 BLC अंतर्गत 250 EWS घरकुलांचे प्रकल्प अहवालातील समाविष्ट 250 पात्र लाभार्थ्यांचे नावास मनपा महासभेची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिपः**- विस्तृत टिपणी नस्तीत सलंग्न.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 24/मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 16/06/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री आवास योजना यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात तथा नागपूर

शहरात अंमलबजावणी माहे डिसेंबर 2015 पासून करण्यात आली असुन सदर योजनेची मुदत डिसेंबर 2024 रोजी संपुष्टात येत आहे. मात्र, अजूनही देशात परवडणा-या घरांची मागणी विचारात घेऊन केंद्र शासनाने दि.01/09/2024 पासून प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 ची देशात अंमलबजावणी करण्याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून राज्य शासनाने शासन निर्णय क्र. प्रआयो 2024/प्र.क्र.87/गृनिधो-2 दि.15/10/2024 अन्वये सदर योजना राज्यात अंमलबजावणी करण्यास मान्यता दिलेली आहे. प्रधानमंत्री आवास योजना शहरी 2.0 ही योजना नागरी क्षेत्राकरीता दि.01/09/2024 पासुन पाच वर्षाकरीता राबविण्यात येणार आहे. सर्व पात्र कुटुंबाना / लाभार्थ्यांना घर उपलब्ध करून देण्याकरीता केन्द्र शासनाच्या आर्थीक सहाय्याने राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी प्रधानमंत्री आवास योजना शहरी 2.0 नागपूर महानगरपालिकेद्वारे नागपूर शहराचे हद्दीत राबविण्याबाबत मनपा महासभा ठराव क्रं. 116/मनपा/प्रशासक दि. 04/01/2025 अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

नागपूर शहरातील इच्छुक नागरीक घटक क्र. 1 BLC अंतर्गत घर बांधकामाकरीता रु. 2.50 लक्ष अनुदान मिळण्यास्तव केंद्र शासनाचे PMAYMIS Portal वर ऑन लाईन अर्ज सादर करीत आहे.

केंद्र शासनाचे PMAYMIS पोर्टलवर प्राप्त अर्जांची तपासणी प्रकल्प सल्लागार मे. आर्चिनोवा डिझाईन इंक व प्रधानमंत्री आवास योजना कक्षाद्वारे करण्यात येत असुन सध्या स्थितीत 250 पात्र अर्जदारांचा प्रकल्प अहवाल क्र. 2 तयार करण्यात आलेला आहे.

करिता प्रधानमंत्री आवास योजना शहरी – 2.0 मधील घटक क्र. 1 BLC अंतर्गत 250 EWS घरकुलांचे प्रकल्प अहवालातील समाविष्ट 250 पात्र लाभार्थ्यांचे नावास मनपा महासभेची मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**